# नूतन मराठी शाळा नं.१ राहुरी जिल्हा अहिल्यानगर

# शिष्यवृत्ती सराव पेपर पाचवी

## विषय – भाषा (घटक-उतारा) गुण -50

भाग १ खालील उतारा वाच.

मित्रांचे आपल्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. आई, वडील, भाऊ, बहीण वगैरे नाती जन्माने सिद्ध होतात. मित्रत्वाचे तसे नाही. ही ऐच्छिक गोष्ट आहे. म्हणून नातेवाईकांपेक्षा मित्रांमध्ये जिव्हाळा असतो. मित्र हे दुःखाच्या प्रसंगी मनाला धीर देणारे, सुखाच्या प्रसंगी आनंद देणारे असल्यामुळे त्यांचा ओढा आपणांस फार वाटतो. तोंडपूजेपणा करणारे, निव्वळ स्तुती करणारे मित्र आपणांस विकत घेता येतात, पण ते खरे मित्र नव्हेतच ! मित्र आरशाप्रमाणे आपले खरे प्रतिबिंब दाखवून आपल्या गुणदोषाचे दर्शन घडवितो, म्हणून मित्राला जीवनप्रवाहाला वळण लावणाऱ्या तटाची उपमा देण्यात आली आहे.

योग्य उत्तराच्या पर्यायाला गोल कर

प्रश्न 1) उताऱ्यावरुन पुढीलपैकी सत्य विधान कोणते ?

1) खरे मित्र विकत घ्यावे लागतात. 2) मित्रत्वाचे नाते जन्मापासून असते. 3) मित्रांचे जीवनात महत्त्वाचे स्थान असते. 4) मित्रांमध्ये जिव्हाळा नसतो.

प्रश्न २) खोटी स्तुती करणे या अर्थाचा कोणता वाक्प्रचार उताऱ्यात आला आहे ?

१) ओढा वाटणे २) तोंडपूजेपणा करणे ३) धीर देणे ४) जिव्हाळा असणे

प्रश्न ३) खरा मित्र कसा असावा ?

1) निव्वळ स्तुती करणारा 2) आपल्या सुखदुःखात सहभागी होणारा 3) दुःखात लांब जाणारा 4) सुखात जवळ येणारा.

प्रश्न 4) वरील उताऱ्यास खालीलपैकी योग्य शीर्षक सुचव.

1) नात्यांचे महत्त्व 2) आनंदी मित्र 3) आरशातील प्रतिबिंब 4) मित्रत्व

प्रश्न 5) खरे प्रतिबिंब दाखवणारा

1) खरा मित्र 2) आरसा 3) 1 व 2 दोन्ही बरोबर 4) यापैकी नाही.

उतारा 2

https://learningwithsmartness.in/

अहमदाबाद ही गुजरातची राजधानी. कपड्यांची नगरी. खूप मोठे मोठे उद्योगधंदे तेथे आहेत. तेथे विविध प्रकारचे कपडे तयार होतात. त्यांना जगभर मागणी आहे. या उद्योगनगरीत एक मोठे उद्योगपती होते. त्यांचा कारखाना सर्वांत मोठा होता. अर्थातच कपड्यांचा. ते खूप श्रीमंत होते. मनानेही श्रीमंत होते. गरिबांचे वाली. हजारो कामगार त्यांच्याकडे काम करत. त्यांना समाधानकारक दाम मिळे. मालक सुखी. कामगारही सुखी. कोणाची कधी तक्रार नव्हती. त्यांचे नाव होते अंबालाल साराभाई. सगळ्या गुजरातमध्ये ते प्रसिद्ध होते. अंबालाल साराभाई हे विक्रम साराभाई यांचे वडील. १२ ऑगस्ट, १९१९ रोजी विक्रम साराभाई यांचा जन्म झाला. विक्रम साराभाई खूप बुद्धिमान होते. तीक्ष्ण बुद्धिमत्तेच्या बळावर त्यांनी अणुशक्तीच्या क्षेत्रात महत्त्वाचे संशोधन केले. या थोर संशोधकाचे मन दुसऱ्याविषयीच्या आपुलकीने ओथंबलेले होते.

प्रश्न 6) विक्रम साराभाई यांचा जन्म कधी झाला?

१) २१ ऑगस्ट, १९१९ २) १२ ऑगस्ट, १९९१ ३) २१ ऑगस्ट, १९९१ ४) १२ ऑगस्ट, १९१९

प्रश्न 7) अहमदाबाद कोणत्या राज्याची राजधानी आहे?

१) राजस्थान २) उत्तराखंड ३) गुजरात ४) महाराष्ट्र

प्रश्न 8) जो संशोधन करतो तो

१) शोधक २) उद्योगपती ३) संशोधक ४) व्यावसायिक

प्रश्न 9) त्यांचा कारखाना सर्वांत मोठा होता. या वाक्यातील सर्वनाम कोणते.

१) सर्वांत २) मोठा ३) त्यांचा ४) होता

प्रश्न 10) त्यांना समाधानकारक दाम मिळे. या वाक्यातील दाम या शब्दाचा अर्थ काय होतो?

१) काम २) दान ३) पैसे ४) शाबासकी

प्रश्न 11) पुढीलपैकी अयोग्य जोडी ओळखा.

१) गरीब X श्रीमंत २) सुखी X आनंदी ३) मालक X सेवक ४) जन्म X मृत्यू

**भाग 3 खालील बातमी वाच.**

आमच्या वार्ताहराकडून जनलहरी दिनांक - १५ जुलै **गावकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाचं पाणी**

रेणापूर, दि. १४ जुलै

काल रात्री झालेल्या मुसळधार आणि संततधार पावसामुळे येथील तलाव काठोकाठ भरुन वाहत आहेत. गेले दोन दिवस पाऊस पडत असल्यामुळे तलावांनी पाण्याची कमाल पातळी गाठली आहे. गावातल्या लोकांसाठी ही समाधानाची गोष्ट आहे. यावर्षी जून महिना पावसाविना कोरडाच गेल्याने तमाम गावकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. गावात दुष्काळाची भीती वाटू लागली होती. मात्र जुलै

https://learningwithsmartness.in/

महिन्याचा पंधरवडा गावकऱ्यांसाठी आनंदाचा ठरला आहे. तशाच गेले २ दिवस पडत असलेल्या पावसामुळे तलाव ओसंडून वाहत आहेत. गावकऱ्यांची पाण्याची चिंता संपली असून त्यांच्या डोळ्यांत आनंदाचे पाणी आहे.

प्रश्न 12) पंधरवडा म्हणजे किती दिवस ?

१) आठ दिवस  २) एक महिना  ३) पंधरा दिवस  ४) एकतीस दिवस

प्रश्न 13) गावकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाचे पाणी आले.

१) तलाव ओसंडून वाहू लागले. २) गावात दुष्काळाची भीती होती. ३) जून महिना कोरडा गेला.४) पाऊस सतत दोन दिवस पडत होता.

प्रश्न 14) खालीलपैकी कोणते विशेषण पावसासाठी योग्य नाही?

१) मुसळधार  २) संततधार  ३) धुवाँधार  ४) धारदार

प्रश्न 15) वरील बातमी कोणत्या वृत्तपत्रातील आहे?

१) जनसागर  २) जनलहरी  ३) जनवार्ता  ४) जनविवेक

प्रश्न 16) दुष्काळ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द खालीलपैकी कोणता?

१) अवकाळ  २) सर्वकाळ  ३) सुकाळ  ४) यापैकी नाही

भाग ४) खालील प्रसंग वाच.

दीपा घाबरीघुबरी होऊन धावतपळतच घरात शिरली. तिने आईला घट्ट मिठी मारली अन् म्हणाली, "आई शेजारच्या गल्लीतल्या एका काकूंच्या घरात गॅसच्या टाकीतून गॅस गळती झाली. सगळे लोक त्यांच्या घराच्या दिशेने धावत होते. अग्निशमन यंत्रणेच्या गाड्यापण आल्या होत्या. लोक पाण्याच्या बादल्या, मातीची घमेली नेत होते. एका काकांनी गाडी काढली अन् काकूला दवाखान्यात नेले. आई, त्या काकू बऱ्या होतील ना गं", एका दमात दीपाने पाहिलेले दृश्य आईला सांगितले. हे सगळे पाहून ती खूप घाबरली होती.आई तिला म्हणाली, "बाळ, त्या काकू नक्कीच बऱ्या होतील. त्यांना नेलंय ना दवाखान्यात. अगं, आता वैद्यकीय क्षेत्रात खूप प्रगती झाली आहे. नवनवीन औषधं, नवनव्या तंत्रज्ञानांचा वापर सुरु झाला आहे. तू घाबरून जाऊ नकोस." तरीही दिपाच्या मनात अनेक प्रश्न होते.

प्रश्न 17) वरील प्रसंगात कोणत्या आपत्तीचा उल्लेख आला आहे?

१) आग  २) गॅस गळती  ३) गॅसच्या टाकीचा स्फोट  ४) शॉर्ट सर्किट

प्रश्न 18) दिपाने आईला घट्ट मिठी मारली. कारण

१) तिला अग्निशमन दलातील लोकांची भीती वाटली.  २) गॅसगळतीचा प्रसंग पाहून ती घावरली होती.

https://learningwithsmartness.in/

३) काकूंच्या घरात आग लागली होती. ४) परिसरातील वीजप्रवाह बंद होऊन वीज गेली होती.

प्रश्न 19) अग्निशमन दलास पाचारण करण्यासाठी कोणत्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधतात?

१) १०० २) १०२ ३) १०३ ४) १०४

प्रश्न 20) वरील प्रसंगास कोणते नाव सुचवता येईल ?

१) सुरक्षा आणि उपाय २) अग्निशमन यंत्रणा ३) संशोधन ४) यांपैकी नाही

प्रश्न 21 प्रसंगातून आपण कोणता बोध घ्यावा?

१) गॅस गळती झाल्यावर पाणी ओतावे. २) घरातील गॅसचा वापर सुरक्षितपणे करावा

३) गॅस गळतीच्या ठिकाणी माती टाकावी. ४) गॅसगळती झाल्यावर खिडक्या बंद कराव्यात.

मोराचा केकारव वर्षा ऋतूचे आगमन सुचवणारा आहे. ग्रीष्म ऋतू संपता संपता उष्णता असह्य होते. त्यावेळी येणारा वर्षासूचक केकारव शेतकऱ्यांमध्ये नवीन आशेचा संचार करतो. ती लवकरच येणाऱ्या पावसाची पूर्वसूचना असते. वर्षा ऋतू हा आनंदाचा काळ आहे. तळ्याची पाळ, हिरवीगार कुरणे, देवालयाची उंच शिखरे, नदी-नाले, ओहोळाचे काठ ही यावेळी मोराच्या स्वैर विहाराची स्थाने असतात. मोर नेहमी आपल्या निवासस्थानापासून अर्धा ते दोन किलोमीटरच्या परिसरात वावरतो. चारा सापडेल त्याप्रमाणे तो फिरतो. तो आपला चारा दिवसाचं शोधतो. काळोख पडण्यापूर्वी तो आपल्या जागेवर येऊन पोहोचतो.

प्रश्न 22) मोराच्या ओरडण्याला म्हणतात

१) आरवणे २) केकारव ३) कलकलाट ४) गुंजारव

प्रश्न 23) खालीलपैकी कोणत्या स्थानी मोर स्वैर विहार करत नाही?

१) तळ्याची पाळं २) हिरवीगार कुरणे ३) मनुष्यवस्ती ४) नदी - नाले

प्रश्न 24) प्राणी किंवा पक्षांना चारा मिळवण्यासाठी आवडणारी जागा खालीलपैकी कोणती?

१) जंगल २) अंगण ३) उघडे बोडके डोंगर ४) हिरवेकर पुरण

प्रश्न 25) वरील उताऱ्यात किती ऋतूंचा उल्लेख आला आहे?

१) वसंत ऋतु २) ग्रीष्म ऋतू ३) पावसाळा ऋतू ४) शरद ऋतु

https://learningwithsmartness.in/